# प्रेसनोट

**अहिल्यानगर**

**दि.०४/०३/२०२६**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | नेवासा पो.स्टे. गु.र.नं. १८०/२०२६ |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | दि. ०५/०३/२०२६ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७अ, प्रमाणे |
| आरोपीचे नांव, वय व कार्यालय | गणेश कचरू घोरपडे वय– ३१ वर्षे, धंदा– सेतु व्यवसाय (गणेश मल्टी सर्व्हिसेस) रा. भैरवाडी, ता. नेवासा, जि.अहिल्यानगर ( खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १२,०००/– रू. त्यापैकी उर्वरती ७,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, दि. १६/०२/२०२६ तक्रारदार व त्यांचा भाऊ हे त्यांचे आई चे नावे असलेली मोजे नेवासा बु तालुका नेवासा येथील ० हे ८० आर क्षेत्रफळ फेरफार रद्द करण्याचे संदर्भात मा. उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर भाग, अहिल्यानगर आरटीएस २१०/२०२५ प्रमाणे दिलेल्या फेरफार रद्द करण्याचे आदेशाची अंमलबजावणी व्हावी या करिता मंडळ अधिकारी नेवासा खुर्द यांना समक्ष भेटले मंडळाधिकारी कार्यालयाबाहेर खाजगी इसम श्री गणेश घोरपडे हे भेटले व तक्रारदार यांना म्हणाले की मी तुमचे काम मंडळाधिकारी श्री बाबासाहेब माने यांच्याकडून करून देतो, मला व श्री बाबासाहेब माने मंडळाधिकारी यांना, १२,०००/– रुपये द्या असे म्हणाले असता तक्रारदार यांचे भावाने खाजगी इसम घोरपडे यांना फोन पे वर ५०००/– रुपये दिले. त्यानंतर दिनांक ०१/०३/२०२६ रोजी खाजगी इसम घोरपडे यांनी तक्रक्रदार यांची भेट घेऊन सांगितले की मी बाबासाहेब माने मंडळाधिकारी तुमचे काम करून दिले त्यामुळे उर्वरित ७०००/– रुपये मला देऊन टाका असे म्हणून खाजगी इसम श्री गणेश घोरपडे हा तक्रारदार याचेकडे लाचेची मागणी करत असले बाबत तक्रार होती<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.०४/०३/२०२६ रोजी १२/३९ ते १२/५१ वाजेच्या दरम्यान गणेश मल्टीसर्व्हिसेस, नेवासा खुर्द, ता. नेवासा येथे लाचमागणी पडताळणी वेळी यातील खाजगी इसम गणेश घोरपडे, सेतु व्यवसाय (गणेश मल्टी सर्व्हिसेस) यांनी तक्रारदार यांच्याकडे बाबासाहेब माने, मंडळाअधिकारी नेवासा बुद्रूक यांच्याकरीता ७,०००/–रू.लाचेची पंचासमक्ष मागणी केली व यशस्वी सापळा कारवाई १४/२९ वा ते १४/५१ वा चे दरम्यान मागणी केलेली सदरची ७०००/–रू. लाचरक्कम गणेश मल्टीसर्व्हिसेस, नेवासा खुर्द, ता. नेवासा येथे गणेश घोरपडे खाजगी इसम यांनी स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |
| सापळा कारवाई | १) पोलीस निरीक्षक श्रीमती छाया देवरे, ला.प्र.वि. अहिल्यानगर मो.नं.८७८८२१५०८६<br>२) पोकॉ/२३७६ गजानन एकनाथ गायकवाड, ३) पोकॉ/२६४२ सचिन नानाभाऊ सुद्रुक<br>४) पोकॉ/ वैभव सुपेकर, ५) चापोहेकॉ हारूण शेख |
| तपास अधिकारी | श्री.अजित त्रिपुटे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. अहिल्यानगर मो.नं.८३२९७०१३४४ |
| मार्गदर्शन | **१) मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा.श्री.माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>४)) पर्यवेक्षण अधिकारी :– पोलीस उप अधीक्षक श्री.अजित त्रिपुटे–मो.नं.८३२९७०१३४४) |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acb.maharashtra.gov.in

ई–मेल :–spacbnashik@mahapolice.gov.in, 2. dyspacba.nagar@gmail.com

ऑनलाईन तक्रार :– acb.maharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७ व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००/९१६८ ६४ १०६४